# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय राज्यघटनेतील योगदान

**कु.अक्षता उदय मेंडगुले** संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर मो.८२०८३६०४१५

Email- akshu1152000@gmail.com

---

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून आधुनिक भारताची लोकशाही चौकट घडवण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले .त्यांच्या योगदानाचे मूळ एका न्याय संगत आणि समतावादी समाजाच्या दृष्टिकोनात होते .सामाजिक न्यायाचे कट्टर समर्थक असलेल्या आंबेडकरांनी संविधानामध्ये वंचित समुदायांचे अधिकार सुरक्षित करण्यासाठी आणि स्वातंत्र्य ,समता, बंधुता यांसारख्या मूल्यांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी काम केले .त्यांनी तयार केलेल्या संविधानाच्या मसुद्यातील नेतृत्वाने असे राष्ट्र घडवण्याची त्यांचा दृढनिश्चय दर्शवते जिथे जात, धर्म, लिंग कोणतेही असले तरी सर्व नागरिकांना समान संधी आणि प्रतिष्ठा मिळावी .आंबेडकरांच्या संविधानाच्या दृष्टिकोनावर जातीय भेदभावाच्या त्यांच्या वैयक्तिक अनुभवांचा आणि मानवी हक्कांवरील त्यांच्या दृढ विश्वासाचा मोठा प्रभाव होता. मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी सामाजिक असमानता रोखणे आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करणे यांसारख्या तत्त्वांना संविधानात स्थान देण्यावर भर दिला. मूलभूत हक्क ,सामाजिक न्याय, अल्पसंख्यांकांचे संरक्षण यावर त्यांनी दिलेला भर त्यांच्या सर्व समावेशक समाज निर्मितीच्या कटिबद्धतेचे प्रतिक होता .विविध स्तरांवर त्यांना झालेल्या विरोधाचा सामना करूनही आंबेडकरांचे योगदान हे भारताच्या लोकशाही व्यवस्थेची आणि सामाजिक संस्थेच्या प्रयत्नांची पायाभरणी करणाऱ्या संविधानाच्या निर्मितीत मोलाचे ठरले.

**संशोधनाचे हेतू :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय संविधानाचा मसुदा तयार करण्यात दिलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.

२. भारतातील सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही घडविण्यात बाबासाहेबांच्या योगदान अभ्यासणे.

३. बाबासाहेबांच्या कार्याचा भारताच्या कायदेशीर आणि राजकीय व्यवस्थांवर झालेला प्रभाव अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधन सामग्री:**

सदर शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये लेख, इंटरनेट तसेच संदर्भ ग्रंथ यांचा वापर केला आहे.

**आशय विश्लेषण:**

**१. भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

भारतीय राज्यघटनेचा इतिहासा भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा , लोकशाही आणि सर्व समावेशक समाजाच्या स्थापनेची बांधिलकी दर्शवणारा प्रवास आहे .भारताच्या समृद्ध सांस्कृतीक विविधता आणि शतकानू शतके जुन्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर आकाराला आलेली भारतीय राज्यघटना ब्रिटिश वसाहत वादा नंतर एकतेचे प्रतीक म्हणून उदयास आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, नेहरू यांसारख्या प्रमुख नेत्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळी दरम्यान स्वयंशासनाच्या मागणीने घटनात्मक प्रवास सुरू झाला. संविधान सभेने विविध प्रदेश, समुदाय आणि जीवनातील प्रतिनिधींचा समावेश असलेल्या संविधानाचा मसुदा तयार करण्याचे कठीण काम हाती घेतले. जे केवळ नागरिकांचे हक्क आणि स्वातंत्र्य सुरक्षित ठेवणार नाही, तर विशाल आणि बहुलवादी समाजाच्या विविध गरजा आणि आकांक्षा देखील सामावून घेईल .भारतीय राज्यघटनेची उत्क्रांती विविध टप्प्यातून झाली आहे. त्यामध्ये नियमन कायदा १७७३ ,पीटचा भारत कायदा १७८४ ,सनद कायदा १८१३, १८३३, १८५३, भारत सरकार कायदा १८५८ ,भारतीय परिषद कायदा १८६१, भारत परिषद कायदा १८९२, मोर्ले मिंटो सुधारणा १९०९, मॉन्टीग्यु जेम्स वर्ड सुधारणा १९१९, भारत सरकार कायदा १९३५, भारतीय स्वातंत्र्य कायदा १९४७ .या प्रत्येक कृतीने भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**२. संविधानाची आवश्यकता:**

कोणतीही संस्था, संघटना ,बँक हे स्वतःच्या विकासासाठी आपली नियमावली तयार करतात आणि त्यानुसार आपला कारभार सांभाळतात. तेव्हाच त्यांची प्रगती होते. तसेच देशाच्या विकासासाठी, देशाचा कारभार सुरळीत चालण्यासाठी काही नियम असणे गरजेचे आहे. ते नियम म्हणजेच संविधान. संविधानामुळे शासनाला नियमांच्या चौकटीत

राहूनच राज्यकारभार करावा लागतो. त्यामुळे त्यांना मिळालेले अधिकार ,सत्ता यांचा दुरुपयोग होण्याची शक्यता कमी असते .संविधानात नागरिकांचे हक्क व कर्तव्य यांचा समावेश असतो. शासनालाही नागरिकांचे हक्क,नागरिकांचे स्वातंत्र्य हिरावून घेता येत नाहीत. म्हणून संविधानातील नियमांमुळे नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य सुरक्षित राहतात. संविधानानुसार राज्यकारभार होत असल्याने सामान्य माणसाचा शासनावरील विश्वास अधिक वाढतो. त्यातून ते राज्यकारभारातील सहभागाला उत्सुक होतात. सामान्य माणसाच्या सहभागामुळे लोकशाही अधिक मजबूत होते. भारतीय संविधानाने आपल्यासमोर धर्मनिरपेक्षतेचा आदर्श ठेवला आहे. तसेच नागरिकांच्या हक्काबरोबरच नागरिकांच्या कर्तव्याचा उल्लेख देखील संविधानात असल्याने नागरिकांची जबाबदारी ही निश्चित होते. अशा पद्धतीने संविधान देशासमोर राजकीय आदर्श ठेवते. या कारणांमुळेच आपल्याला संविधान असणे आवश्यक आहे.

**३. संविधान सभा:**

भारताची संविधान सभा ही भारताचे संविधान निर्माण करण्यासाठी ९ डिसेंबर १९४६ मध्ये स्थापन करण्यात आली .भारतासाठी संविधान सभा बनवण्याची कल्पना सर्वप्रथम १९३४ मध्ये मानवेंद्रनाथ रॉय यांनी दिली होती. त्यानंतर सी. राजगोपालाचारी यांनी १५नोव्हेंबर १९३९ रोजी प्रौढ मतदानावर आधारित संविधान सभा घेण्याच्या मागणी संदर्भात आवाज उठवला. ब्रिटिशांनी ऑगस्ट १९४०मध्ये ही मागणी मान्य केली. व्हॉईसरॉय लॉर्ड यांनी ऑगस्ट ऑफर मध्ये भारतीयांना स्वतःची राज्यघटना तयार करण्याची परवानगी देण्यात आली. १९४६च्या कॅबिनेट मिशन पॅनलच्या अंतर्गत संविधान सभेसाठी प्रथमच निवडणुका घेण्यात आल्या. संविधान सभा सदस्य प्रांतीय संमेलना द्वारे एकल हस्तांतरणीय मताद्वारे निवडले गेले. संविधान सभेचे एकूण सदस्यत्व ३८९ होते. त्यापैकी २९२ राज्यांचे प्रतिनिधी होते, ९३ हे संस्थानांचे प्रतिनिधी होते आणि ४ दिल्लीचे मुख्य आयुक्त होते .विधानसभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,बी एन राव, जवाहरलाल नेहरू ,सरदार वल्लभ भाई पटेल ,जे.बी. कृपलानी, अब्दुल कलाम, डॉ. राजेंद्र प्रसाद, सी. राजगोपालाचारी, कृष्णा सिन्हा, गोपाल स्वामी अय्यंगर हे काही महत्त्वाचे सदस्य होते .तसेच संविधान सभेने संविधान बनवण्याच्या वेगवेगळया कामांसाठी एकूण २२ समित्या नेमल्या होत्या. त्यापैकी काही प्रमुख समित्या व त्यांचे अध्यक्ष पुढीलप्रमाणे :

१. मसुदा समिती- डॉ.बाबासाहेब आंबेडकर
२. केंद्रीय ऊर्जा समिती- जवाहरलाल नेहरू
३. केंद्रीय घटना समिती- जवाहरलाल नेहरू
४. प्रांतीय घटना समिती- वल्लभभाई पटेल _
५. मूलभूत हक्क, अल्पसंख्यांक, आदिवासी आणि अपवर्जीत क्षेत्रांची सल्लागार समिती- सरदार वल्लभभाई पटेल
६. सुकाणू समिती -डॉक्टर राजेंद्र प्रसाद

**४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संविधान सभेतील भूमिका:**

स्वातंत्र्यानंतर संविधान सभेने घटनात्मक सल्लागारांनी प्रदान केलेल्या भारतीय राज्यघटनेच्या मसुदाच्या मजकुराचे पुनरावलोकन करण्यासाठी ठरावाद्वारे २९ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीची स्थापना केली. डॉ. आंबेडकरांची भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. ३० ऑगस्ट १९४७ रोजी समितीच्या पहिल्या बैठकीत इतर सात सदस्यांमधून त्यांची निवड केली. आंबेडकर हे कायदे तज्ञ, अर्थतज्ञ होते. त्यांनी ६० पेक्षा अधिक देशांच्या संविधानाचा अभ्यास केला होता. स्वतंत्र भारताची सार्वभौम, जगप्रसिद्ध अशी राज्यघटना लिहून त्या घटनेचे बाबासाहेब शिल्पकार ठरले. या घटनेच्या आधारे भारत देश कसा चालवला जातो याचे दर्शन घडते आणि म्हणूनच संपूर्ण देशाला मार्गदर्शन करणारी, नियंत्रित करणारी, संपूर्ण देशाचा विकास घडवून आणणारी, देशातील माणसांना माणुसकी, मान सन्मानाचे आणि नैतिकतेचे दर्शन घडवणारी राज्यघटना संपूर्ण जगाला आदर्शवत अशी ठरणारी, देशातील सर्व जाती, धर्म ,पंथ, लिंग, भेद यांपासून संरक्षण देणारी राज्यघटना बाबासाहेबांच्या हातून लिहिली गेली आहे. बाबासाहेबांनी प्रचंड मेहनत घेऊन भारतीय संस्कृती व विचारधारा विचारात घेऊन रात्रंदिवस काम करून एक उत्तम आदर्श लवचिक ग्रंथ ,स्वतः आजारी असताना देखील २ वर्ष ११ महिने व १८ दिवस सातत्याने समतोल विचाराचे कल्याणकारी संविधान देशाला अर्पण केले आहे.

**५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय राज्यघटनेतील वैचारिक योगदान:**

**अ) डॉ आंबेडकर यांचे राज्यसंस्थेसंबंधी विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या 'स्टेट्स अँड मायनॉरिटीज' या ग्रंथामध्ये राज्यविषयक विचार मांडलेले आहेत .त्यांच्या मते राज्य ही सामाजिक परिवर्तनाचे साधन असून सामाजिक कल्याण हे त्याचे उद्दिष्ट असते .आंबेडकरांना

कल्याणकारी राज्याची कल्पना अभिप्रेत होती. त्यांनी राज्य समाजवादाचे स्वप्न साकार करण्यासाठी राज्यसंस्थेची आवश्यकता सांगितली. सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी जी योजना करावी लागते तिला राज्य समाजवाद असे म्हणतात. नागरिकांना हक्क देणारी आणि त्या हक्कांना संरक्षणाचे हमी देणारी संस्था म्हणजे राज्यसंस्था होय .डॉ. आंबेडकर यांच्या मते राज्याची निर्मिती मानवी गरजेतून झालेली आहे. त्यांना राज्याच्या उदयाचा दैवी सिद्धांत मान्य नव्हता .राज्यसंस्था ही केवळ शांतता सुव्यवस्था प्रस्थापित करणारी संस्था नसून ती लोकांचे जीवन सुखी समृद्ध करणारी कल्याणकारी संस्था आहे .राज्य ही नागरिकांच्या अधिकारांचे रक्षण करून त्या अधिकारांची अंमलबजावणी करणारी आवश्यक अशी संस्था आहे. राज्याची कर्तव्य स्पष्ट करताना आंबेडकर म्हणतात, आर्थिक आणि सामाजिक समता प्रस्थापित करण्याची महत्त्वाची जबाबदारी राज्याला लोकशाही पद्धतीने पार पाडावी लागते. आर्थिक परिवर्तन घडवून आणल्याशिवाय सामाजिक परिवर्तन घडवून आणता येत नाही. समता प्रस्थापित करण्यासाठी राज्यातील नागरिकांना आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात स्वातंत्र्य विषयक वातावरण उपलब्ध करून दिले पाहिजे. नागरिकांना आपल्या अधिकारांचा, स्वातंत्र्याचा उपयोग करून घेण्यासाठी राज्याने तशी संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. अर्थात नागरिकांनी सुद्धा राज्याच्या आज्ञांचे ,नियमांचे पालन केले पाहिजे .तसेच अंतर्गत सुरक्षा आणि परकीय आक्रमण यासाठी राज्याने आपले सामर्थ्य वाढवले पाहिजे. राज्याची कर्तव्य पार पाडत असताना शासनाने अनियंत्रित व हुकूमशाही प्रवृत्तीच्या असू नये. वेळ प्रसंगी आवश्यकतेनुसार शासनाने नागरिकांच्या अधिकाऱ्यांवर बंधने लागावीत असे आंबेडकरांचे मत होते .व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच करणारी, व्यक्तीचे व्यक्तित्व चिरडणारी राजकीय सत्ता आंबेडकरांना मान्य नव्हती. राज्याची सत्ता आणि व्यक्तीचे अधिकार यात समन्वय साधून अधिकारांचा लाभ समाजातील अधिकारी लोकांना मिळाला पाहिजे असे त्यांचे मत होते.

**ब) शासन संस्थेच्या स्वरूपाविषयीचे विचार:**

डॉ. आंबेडकरांचे उच्च शिक्षण बराच काळ पाश्चात्त्य देशात झाल्यामुळे इंग्लंड, अमेरिका देशातील लोकशाही संस्थांचा आणि तेथील उदारमतवादी विचारसरणीचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडलेला होता. त्यांना तेथील राजकीय संस्थांविषयी आपलेपणा वाटत होता. अमेरिकेतील सत्ता विभाजनाच्या तत्वाने आंबेडकरांना आकर्षित केले होते. त्यांच्या मते सत्ता विभाजनामुळे राजकीय सत्ता आणि व्यक्ती स्वातंत्र्य यामध्ये समतोल निर्माण होतो. भारताच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचा विचार केला असता शासनाच्या तिन्ही शाखा विभक्त ठेवणे सोयीस्कर ठरेल असे त्यांचे मत होते. भारतातील प्रतिनिधी गृहातील बहुमत हे जातीय स्वरूपाचे असल्यामुळे हे बहुसंख्यांकाचे प्रतिनिधित्व अल्पसंख्यांकांना चिरडून टाकण्याचा प्रयत्न करेल तेव्हा भारतात संसदीय शासन पद्धती स्वीकारली पाहिजे असे त्यांचे मत होते.

संसदीय शासन पद्धती यशस्वी करण्यासाठी पुढील काही बाबी त्यांनी सांगितल्या आहेत.

१) अल्पसंख्याकांचा ज्या प्रतिनिधीवर विश्वास नाही अशा बहुसंख्यांकाच्या प्रतिनिधींना मंत्रिमंडळात समाविष्ट करू नये.

२) कार्यक्षम स्थिर अशा मंत्रिमंडळाच्या निर्मितीसाठी कार्यक्षम प्रशासनाची स्थापना करण्यात यावी .

३) दैनंदिन राज्यकारभारावर बहुसंख्यांकांचे नियंत्रण असू नये. कारण त्यामुळे अल्पसंख्याकांचे हितसंबंध धोक्यात येऊन त्यांचे हक्क संपुष्टात येतील.

४) बहुसंख्यांकांचे सरकार स्थापन करण्याची परवानगी देण्यापूर्वी अल्पसंख्यांकांचे मत विचारत घेण्यात यावे.

५) सामाजिक परिवर्तन करण्याच्या उद्देशाने विधिमंडळाने मंजूर केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी. अशा प्रकारची पथ्य पाळून शासनाच्या तिन्ही विभागाने परस्परांच्या कार्यात अवास्तव करू नये. व्यक्तीच्या हक्कावर आक्रमण करणाऱ्यांवर न्यायमंडळाने त्वरित करावा कारवाई करून अशा प्रवृत्तीस आळा घालावा, असे बाबासाहेबांचे विचार होते .

**क) बाबासाहेबांचे लोकशाही संबंधिचे विचार:**

बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीचे उपासक होते. त्यांची संसदीय लोकशाहीवर खूप निष्ठा होती. त्यांनी अध्यक्षीय लोकशाहीपेक्षा संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला. अध्यक्ष लोकशाहीत एका व्यक्तीच्या हातात अधिक सत्ता जाऊ शकते म्हणून त्यांनी विचारपूर्वक संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. संसदीय प्रातिनिधिक संस्थातून त्यांनी अनेक वर्ष कार्य केले. भारतातील दुर्बल घटकांचा प्रश्न मुख्यत्वे आर्थिक नसून प्रामुख्याने सांस्कृतिक आहे. कम्युनिस्ट नेते फक्त अर्थप्रधान विचारांना जास्तीत जास्त महत्त्व देत. बाबासाहेब जरी गौतम बुद्धात मार्क्स पाहत होते तरी त्यांना धार्मिक सामाजिक सुधारणांची अत्यंत निकड होती. म्हणूनच लोकशाही पद्धतीला जवळचा असा बुद्ध धर्म त्यांनी स्वीकारला. डॉ.

आंबेडकरांच्या मते लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात जिच्या द्वारा रक्तपता शिवाय मुलगामी क्रांतिकारक बदल घडवून आणता येतात अशी शासनाची घडण किंवा पद्धती म्हणजे लोकशाही होय.

**सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय संविधान निर्मितीतील भूमिका ही न्याय संगत आणि समतावादी समाज निर्माण करण्यासाठी त्यांच्या दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. त्यांच्या दूरदृष्टीने केवळ स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील तातडीच्या आव्हानांनाच उत्तर दिले नाही, तर दीर्घकालीन सामाजिक न्याय, लोकशाही शासन व्यवस्था आणि वैयक्तिक हक्कांचे संरक्षण यांची पायाभरणी केली. त्यांनी सामना केलेल्या सामाजिक आणि राजकीय आव्हानानंतरही आंबेडकरांचे योगदान आधुनिक भारतात आजही प्रतिबिंबित होते. ज्यामुळे संविधान सर्व नागरिकांसाठी समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांचे रक्षण करणारे जिवंत दस्तऐवज बनले आहे. संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांचा वारसा भारताच्या सामाजिक आणि आर्थिक समतेच्या प्रवासात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१) कीर धनंजय (१९६६), डॉ .बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई .

२) पाटील बी .बी (१९९७), भारतीय राजकीय विचारवंत, फडके प्रकाशन कोल्हापूर

३) यशवंत मनोहर (१९९९), आंबेडकरवादी मराठी साहित्य, युग साक्षी प्रकाशन, नागपूर.

४) सौताडकर विवेक (२०१०) महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विद्याभारती प्रकाशन, लातूर

५) बाबासाहेब आंबेडकर (२०२४) भारताचे संविधान, मधुश्री प्रकाशन, पुणे

६) लुलेकर प्रल्हाद (२०१५) अनंत पैलूंचा सामजिक योद्धा: दलित्तेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सायन पब्लिकेशन, पुणे